वर्ष २२
अंक २ रा
१५ आगस्ट १९४८

# समाजस्वास्थ्य



संपादक -
र. धों. कर्वे.
एम्. ए.

किंमत ४ आणे

# अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| १. ब्रह्मचर्याचे दुष्परिणाम १ … … … | २५ |
| २. कामविषयक संशोधन … … … | ३१ |
| ३. पुरुषांची घमेंड … … … | ३६ |
| ४. पत्रव्यवहार … … … … | ३८ |
| ५. शारदेचें पत्र … … … … | ४३ |
| ६. अहाराविषयी एक गैरसमज … … … | ४७ |



## अेजंटांचीं नांवें

**मुंबई :** श्री. विठ्ठल बाबू बागवे, न्यूज एजंट, दादर.

**पुणें :** अेल्. के. जोशी, बुकसेलर.
डी. अेच्. शहा, बुकसेलर.

**कोल्हापूर:** स्कूल अेन्ड कॉलेज बुकस्टॉल.

**बेळगांव:** जे. एम. माणूरकर, खडे बाजार.

**अहमदनगर:** पी जी. बापट, बुकसेलर, नवी पेठ.

**निपाणी :** के. एस्. बळगुर्गी

**कुमठा :** आर्. एम्. कामत

**नागपूर** सी. सी. ताठे, नवयुग न्यूज अेजन्सी.

**गोकाक :** पी. एम्. शिरगांवकर

**सावंतवाडी :** विनायक के. वाडकर.

**समाजस्वास्थ्य** मासिकाचे जुने दुर्मिळ अंक **मूळ किंमतीस** मिळतील. वि. वि लिमये, पंढरपूर.

उच्चवर्णीय सुशिक्षित तरुणास मैत्रीण पाहिजे. लग्नाचेंही जमवतां येईल. पत्रव्यवहार गुप्त स्वतः लिहावें. **X** C/O **समाजस्वास्थ्य**

अश्लीलता हा कोणत्याही लेखाचा, चित्राचा किंवा इतर वस्तूचा गुण नसून तो फक्त तसा आरोप करणारांच्या मेंदूचा गुण होय.

# ब्रह्मचर्याचे दुष्परिणाम–१

आतांपर्यंतच्या विवेचनावरून हें सहज लक्षांत येईल की कामवासना नैसर्गिक असून तीवर जबरदस्तीने धार्मिक बंधनें लादल्याचे परिणाम त्या वासनेच्या तीव्रतेच्या मानानें कमीअधिक अनिष्ट होतील. आणि प्रत्यक्ष अनुभव असाच येतो. शारीरिक गरज दडपून टाकल्याचे परिणाम मानसिक रोगांच्या रूपाने नेहमी दिसतात.

सुखाच्या जीवनाचीं सर्व साधनें असतांना पुष्कळांना विषण्णता, औदासीन्य, वगैरे उत्पन्न होऊन कशांतही आनंद वाटत नाहीसा होतो व जीवनाचा कंटाळा आलेला दिसतो. याचें बहुधा अेकच कारण असतें. तें म्हणजे कामवासनेचें अजीबात किंवा पुरेशा प्रमाणांत समाधान होत नाही, कारण सामाजिक बंधनें आड येतात आणि हीं बंधनें धर्मावर आधारलेलीं असतात. अशा स्थितींत मनाला शांति लाभत नाही अितकेंच नव्हे तर कधीकधी याचें रोगांत पर्यवसान होतें यांत नवल काय ?

कामवासनेचें समाधान झाल्यास झोप चांगली येते व प्रकृतीच्या दृष्टीने ही बाब महत्वाची आहे. झोप न येण्याचें कारण बहुधा या बाबतींतलें असमाधान असतें. समाजांत वागतांना स्त्रीपुरुषांच्या भेटी होऊन कामवासनेला उत्तेजन मिळतें, पण तिचें समाधान मात्र करतां नये अशी चालू नीति असल्यामुळे मानसिक रोग उत्पन्न न झाले तरच नवल. ज्या प्राण्यांना विशिष्ट हंगामांत माज येतो, त्यांच्यांत हे परिणाम तीव्रतेने दिस-

तात. हत्तींचें अशा वेळीं समाधान न झालें तर त्याला वेड लागतें. पण मानवी समाजांत कामवासना दडपून टाकण्यालाच नीति मानतात. नपुंसक नसून नपुंसकासारखें वागणें म्हणजे नीति, अशीच व्याख्या सुधारलेल्या म्हणवणाऱ्या समाजांत दिसते. अर्थात् या नीतीचे परिणाम सर्वांवर सारखे होत नाहीत. ज्यांची कामवासना फारच मंद असते, म्हणजे जे जवळजवळ नपुंसक असतात, त्यांना यापासून विशेष अिजा होत नाही किंवा त्रासही होत नाही. यावरून कित्येक डाक्तर ठेकून देतात की ब्रह्यचर्यापासून अिजा होत नाही, कारण अशीं कांही उदाहरणें त्यांनी पाहिलेलीं असतात. पण हा भ्रम आहे. सत्तर वर्षांच्या अेका पाद्याने अेका डाक्तराजवळ स्पष्ट सांगितलें की 'मी ब्रह्मचर्याचा नियम कसोशीने पाळला, पण असाच नियम पाळायचा असेल, तर मला कोणी पुनः तारुण्य देऊं केलें तरी मी तें घेणार नाही.' असाच दुसरा अेक पाद्री याच नियमामुळे वेडा होऊन बत्तिसाव्या वर्षीं मेल्याचें उदाहरण आहे.

ब्रह्मचर्यामुळे अनेक प्रकारचे रोग उद्भवतात हें पूर्वीं लोकांना खरें वाटत नसे, पपंतु डॉ. फ्रॉअिड यांच्या संशोधनामुळे हें उघड झालें आहे. त्यांचीं सर्वच मतें कोणाला मान्य होणार नाहीत, परंतु त्यांनी कांही महत्वाचे शोध लावले आहेत यांत शंका नाही. मानसिक रोगांवर उपचार करतांना हे रोग कशामुळे उद्भवतात असा प्रश्न मनांत येऊन त्यांनी त्या दृष्टीने संशोधन केलें आणि त्यांना असें आढळलें की बहुतेक वेळां हे रोग कामवासनेबाबतच्या सामाजिक बंधनांमुळे उत्पन्न झालेले असतात. त्यांचें संपूर्ण विवेचन त्यांनी केलें आहे, तें येथे देतां येत नाही, परंतु कांही महत्वाचे प्रकार देतों.

**१. मुलांचे रोग.** येथे मुलें याचा अर्थ ज्या वयांत वागणुकीवर पालकांची देखरेख असते, अशा वयांतलीं माणसें. अशा वयांतही समागमाची तीव्र अिच्छा असूं शकते, पण ती पूर्ण करतां येत नाही, यामुळे कित्येकांना रक्तक्षय होऊन नेहमी थकवा येतो आणि पालकांशीं किंवा शिक्ष-

कांशीं भांडणें होतात. अशीं माणसें उदास, लाजाळू, भित्रीं, घुमीं, आंतल्या गांठीचीं होतात. यांतून त्यांना अेकच मार्ग असतो आणि स्वसंभोगाची अतिरिक्त संवय पुष्कळांना लागते. ज्या वयांत कामवासना अत्यंत तीव्र असून समागमाने विशेष सुख होण्याचा संभव असतो, त्याच वयांत सामाजिक बंधनें आड आल्यामुळें कित्येकांना वयांत आल्यावर वेड लागतें, किंवा वेडच न लागलें तरी त्यांच्या स्वभावावर अत्यंत अनिष्ट परिणाम होऊन तीं खूनशी बनतात. अशांना 'रेफर्मेटरी' नांवाच्या संस्थांत पाठवतात. नांवावरून अशा संस्थांचा उद्देश स्वभाव सुधारण्याचा असतो, परंतु कारण न कळल्यामुळे त्यांचा उपयोग होत नाही. कामपूर्तीची संधि अशा वेळीं मिळाल्यास ताबडतोब प्रकृति सुधारते आणि स्वभाव प्रकृतीचाच परिणाम असल्यामुळे तो ताबडतोब ताळ्यावर येतो. हा फरक अितक्या जलद होतो की पुष्कळांना आश्चर्य वाटतें. पूर्वीं उदास आणि अशक्त दिसणारीं माणसें अेकदम जिवंत दिसूं लागतात, त्यांना अेकदम उत्साह वाटूं लागतो.

२. **विवाहितांचे रोग.** यावरून विवाहित स्थितींत असे रोग होणार नाहीत असें सहजच कोणाला वाटेल, पण तसा नियम नाही. कामवासनेच्या बाबतींत माणसांत दोन प्रकार आढळतात हें पूर्वींच सांगितलें आहे. कित्येकांना कौटुंबिक जीवनांत समाधान वाटत असल्यामुळे त्यांत बाध आला नाही तोंपर्यंत ते खुष असतात. परंतु कित्येकांना वैचित्र्याशिवाय पूर्ण समाधान होणें अशक्य असतें. वर्षानुवर्षं अेकाच व्यक्तीशीं समागमाने त्यांचें समाधान होत नाही, त्यांना वारंवार फेरपालट पाहिजे असतो. ही केवळ लहर असते असें नाही. असे पुरुष स्वतःच्या बायकोपुरते नपुंसक होतात, परंतु अितर स्त्रियांशीं ते नपुंसक नसतात. अशा लोकांवर अेकपत्नीव्रत किंवा पातिव्रत्य लादल्यास त्यांना आपल्या पत्नीबद्दल किंवा पतीबद्दल बिलकुल प्रेम रहात नाही, अितकेंच नव्हे तर द्वेष वाटूं लागतो आणि याचें पर्यवसान अेखादे वेळीं खुनांतही होतें. अशा लोकांना वैवाहिक बंधनें सहन होत नाहीत. पारंपरिक लोकांना हें विधान निदान आर्यस्त्रियांचे बाबतींत खरें वाटणार नाही, परंतु अशा स्त्रिया

कधीही पतिव्रता असत नाहीत. त्यांना चोरून व्यभिचार करणें अशक्य झालें तर त्या कशाचीही पर्वा न करतां पतीला सोडून जातात. अशीं उदाहरणें प्रतिष्ठित कुटुंबांतही घडलेलीं सर्वांना माहीत आहेत.

पुढील हकीकत एका तज्ञाने दिली आहे. कांही मुलें असलेल्या सुमारें तीस वर्षांच्या एका विवाहित स्त्रीला अेकदम विकृति होऊन तिच्या चमत्कारिक वागणुकीचा कोणालाच अर्थ कळेना. पतीचें तिच्यावर अतिशय प्रेम होतें, पण तिचें त्यावर बिलकुल नव्हतें, असें मनोविश्लेषणाच्या चिकित्सापद्धतीनें समजलें. त्याच्याशीं समागमांत तिला बिलकुल सुख होत नसे. विवाहित स्थिति ही तिला तुरुंगासारखी वाटत होती, कारण दुसऱ्या कोणा पुरुषाशीं संबंध येऊन, त्यावर प्रेम बसून त्याकडून सुख मिळणें विवाहाने जवळजवळ अशक्य होतें. असें सुख आपल्याला जन्मांत मिळणार नाही, या कल्पनेनेच ती वेडी झाली होती. तिला आपली प्रकृति सुधारण्याकरतां दूर जाण्याची परवानगी नवऱ्याने दिली आणि तिचा उपयोग तिने अितर पुरुषांशीं संबंध जोडण्याकरतां केल्यानंतरच तिची प्रकृति सुधारली.

या विषयांतले जगन्मान्य तज्ञ डॉ. हिर्शफेल्ट यांना अेका व्याख्यानाच्या वेळीं अेका स्त्रीने प्रश्न केला, ' माझा विवाह समाधानकारक असून देखील मला परपुरुषाची तीव्र अिच्छा होते, ती कां ? ' डाक्तरांनी उत्तर दिलें कीं, यांत विसंगति मुळीच नाही. प्रेम आणि संगमेच्छा यांत फरक आहे. नवऱ्यावर प्रेम असून देखील अेखाद्या पुरुषाबद्दल संगमेच्छा उत्पन्न होणें अशक्य नाही. स्त्रीपुरुषांची अेकमेकांविषयीं कामवासना नैसर्गिक आहे. तिच्यावर बंधनें लादल्याने ती नाहीशीं होत नाही. तिला प्रेमच लागतें असें नाही. '

अशा बंधनांपासून पुरुषांना त्रास कमी होतो, कारण सामान्यतः पुरुषांनी अितरत्र आपली सोय करून घेतली तरी त्यांना समाजाचा फारसा जाच होत नाही. पण ज्या समाजांत पुरुषांवरही कडक पहारा असेल, किंवा

विवाहबाह्य समागम कांही कारणाने जवळजवळ अशक्य असेल, तेथे पुरुषांवरही तसेच परिणाम होतात. त्यांचा अेकंदर स्वभाव पालटतो आणि ते क्षुल्लक कारणावरून चिडतात. पत्नीला याचें कारण समजत नाही, पण पतीला अितरत्र समागमाची संधि मिळाल्यास त्याचा स्वभाव पुन्हां गोड होतो. सोडलग्नाच्या खटल्यांत न्यायालयांत कोणतेंही कारण पुढें आलें तरी खरें कारण बहुधा अशा प्रकारचें असमाधान असतें, असें बारकाअीने पाहिल्यास दिसतें.

३. कामुकतेला योग्य वाव मिळाला नाही तर त्याचा परिणाम पुष्कळ वेळां वाङ्मयांत दिसतो. अशा प्रकारचे लेखक आपलें लिखाण कामुक वर्णनांनी भरून काढतात. यहुदी व क्रिस्ती लोकांचा धर्मग्रंथ जें बायबल, त्यांत या दोहोंनाही मान्य असलेल्या पहिल्या भागांत ( ओल्ड टेस्टॅमेंट किंवा जुना करार ) ' सॉंग ऑफ सॉलोमन ' किंवा ' सॉंग ऑफ सॉंग्ज ' नांवाचा जो भाग आहे, त्याच्याअितकें कामुक काव्य क्वचितच कोठे सांपडेल. क्रिस्ती धर्मांत ' कार्मेलाअिट ' नांवाचा जो पंथ आहे, त्यांतील स्त्रिया येशू क्रिस्ताला आपला पति मानतात. कित्येक क्रिस्ती स्त्रिया येशू क्रिस्ताच्या मूर्तीला आलिंगन देतांनाही आढळलेल्या आहेत. कामुकतेचें रूपांतर पुष्कळ वेळां धार्मिक वृत्तींत होतें हें मानसशास्त्रज्ञांना माहीत असतें. फ्रॉअिड्च्या मनोविश्लेषणपद्धतीने तर ही गोष्ट अधिक स्पष्ट झाली आहे. कामुकतेचें समाधान जोंपर्यंत नैसर्गिक मार्गांनी होतें, तोंपर्यंत मनुष्य धर्माकडे वळत नाहीं, पण सामाजिक बंधनांमुळे तें अशक्य झाल्यास मात्र धर्माचें फावतें. त्यांतही शक्य तितकी कामुकता शिल्लक राहतेच. कृष्णाच्या आणि गोपींच्या गोष्टी धार्मिक लोकांना अत्यंत प्रिय असतात याचें कारण हेंच. जीं वर्णनें अितरासंबंधी केलीं तर लोक नांवें ठेवतात, तींच कृष्ण आणि गोपींविषयीं केलीं तर तेच लोक मिटक्या मारीत वाचतात आणि गातात.

पुष्कळ वेळां अशा लोकांना धर्माने समाधान न मिळाल्यास ते कामुक वर्णनांनीं भरलेलीं निनांवी पत्रें लिहितात. अशीं पत्रें लिहिणारांचा अेखादे

वेळीं पत्ता लागलाच, तर अशीं माणसें पुष्कळ वेळां अत्यंत प्रतिष्ठित घराण्यांतलीं असून त्यांनी पत्रांत वापरलेले शब्द त्यांना माहीत देखील नसतील अशी लोकांची कल्पना असते. अशा माणसांत पुरुषांप्रमाणेंच स्त्रियाहीं सांपडतात. अशीं पत्रें लिहिणारांत वेश्या किंवा बाहेरख्याली मनुष्य, किंवा विवाहांत ज्यांना पुरेसें समाधान मिळतें असे लोक कधींही सांपडत नाहीत, हें लक्षांत घेण्यासारखें आहे.

फ्रॉअिडच्या मताचा हा अेक पुरावाच आहे. त्याने कामुकतेला फाजील महत्व दिलें हें जरीं खरें असलें, तरी नैसर्गिक कामवासनेला दडपण्याचा प्रयत्न केल्यास त्याचे परिणाम भयंकर होतात हें उघड आहे. ज्यांना नैसर्गिक समाधान लाभत नाही ते भलत्या मार्गांकडे वळतात. अशा कृत्रिम नीतीची त्यांना बिलकुल पर्वा नसते आणि ते पुष्कळ वेळां बेफाम होतात, किंवा निदान नीतीचें ढोंग करून गुप्तपणें पाहिजे तें करतात. त्यांना बिलकुल ताळतंत्र रहात नाही.

अशा दडपलेल्या लोकांना ' अश्लील ' समजलेले शब्द अतिशय प्रिय असतात, आणि ढोंगामुळें त्यांचा उघड उपयोग करतां येत नसला तरी ते खाजगी रीतीनें वापरण्यांत आनंद मानतात आणि हें बिंग एखादे वेळीं बाहेर फुटतें. एकदां दहाबारा तरुणतरुणी एकत्र खेळत असतां प्रत्येकानें एका कागदावर वाटेल तो शब्द लिहावा असें ठरवलें. असें अनेक वेळां केल्यावर असें आढळलें की प्रत्येक वेळीं फक्त एकाच चिठ्ठीवर एखादा ' अश्लील ' शब्द लिहिलेला असे. अर्थात् या कागदांवर सह्या नव्हत्या, पण नंतर हस्ताक्षर ताडून पाहतां असें आढळलें की त्यांत जी एकच अविवाहित मुलगी होती तिने हा शब्द लिहिलेला होता. याचे कारण उघड आहे. जिच्या कामवासनेला वाव नाहीं अशी ती एकटीच होती. याचें कारणानें प्रेमिकांच्या गुप्त भाषणांत किंवा पत्रांत ' अश्लील ' शब्दांची रेलचेल असते. याचें कारण या शब्दांना समाजांत परवानगी नसते. बंधनांचा हा ठरलेला परिणाम आहे.

अशा प्रकारचे परिणाम सामुदायिक रीत्या देखील कधी कधी दिसतात. प्रसिद्ध सिनेमा नट रुडॉल्फ व्हॅलेंटीनो याला जगांतील सर्वांत देखणा पुरुष समजत असत. त्याचें प्रेत अमेरिकेंत दर्शनाकरतां ठेवलें होतें तेव्हां कित्येक स्त्रिया तेथें जाऊन उघडपणें मनसोक्त रडल्या. कित्येक वेळां अशा असमाधानाला युद्धाचा देखील विरंगुळा वाटतो. युद्धाचे परिणाम कितीही भयंकर असले, तरी गेल्या दोन्ही महायुद्धांत असाच अनुभव आला की निदान आरंभीं तरी तरुणांना युद्ध आवडतें, कारण नेहमीच्या ठरींव आयुष्यांतून त्यांची सुटका होते आणि बऱ्याच प्रकारची मोकळीक मिळते. या युद्धांत स्त्रियांनाही घर सोडून कामावर जाण्याची संधि मिळाली. अशा स्थितींत अनेक नव्यानव्या स्त्रीपुरुषांची ओळख होण्याचे प्रसंग येतात, यामुळें सर्वांचाच उत्साह वाढतो. युद्ध ज्या स्थितींत आवडूं लागतें, अशी समाजस्थिति भयंकर आहे हें कोणालाही कबूल करावें लागेल, अशा स्थितींत युद्धें अजीबात बंद करण्याची खटपट कधीही यशस्वी होणार नाहीं हें उघड आहे.

---

# कामविषयक संशोधन

अमेरिकेंतील इंडियाना विश्वविद्यालयांतील प्रो. आल्फ्रेड किन्से यांनी नुकतेंच ' मानवी नराची कामविषयक वागणूक ' अशा नांवाचें अेक आठशें पानाचें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. यांतील माहिती मिळवण्याकरतां १२००० पुरुषांना प्रश्न विचारावे लागले. या कामांत त्यांना तीन सहकारी असून सुद्धां त्याला अेकंदर नऊ वर्षें लागलीं. हे प्रश्न पुढील मुद्यांवर होते. १. स्वसंभोग, २. स्वप्नावस्था, ३. स्त्रियांशीं चुंबनादि प्रकार, ४. विवाहपूर्व समागम, ५. वैवाहिक संबंध, ६. विवाहबाह्य संबंध, ७. वेश्यांशीं संबंध, ८. समसंभोग, व ९. पशुसंभोग. ज्यांना प्रश्न विचारले त्यांत विद्यार्थी, कारकून, मानसशास्त्रज्ञ, कारखानदार, प्रोफेसर, सहकारी मंडळ्यांतील अधिकारी, शेतकरी, संपादक, वेश्या, पाद्री, घरकामाचे नोकर, लग्नें जुळवि-

णारे, पत्नीला व्यभिचाराची मुभा देणारे, पोलीस, माजी गुन्हेगार, शिक्षक, पेढीवाले, कामगार, असे सर्व प्रकारचे लोक होते. श्रीमंत, मध्यम व गरीब; तरुण, मध्यमवयस्क आणि म्हातारे; विवाहित, अविवाहित, विधुर किंवा सोडलग्न झालेले; प्रॉटेस्टंट, कॅथोलिक व यहुदी, शिद्दी, आणि गोरे व काळे असे सर्व प्रकार असून अेकंदर निदान दहाबारा देशांचे लोक होते.

ही चौकशी केवळ शास्त्रीय दृष्टीने केलेली होती आणि तींत नीति-अनीतीचा बिलकुल संबंध येऊं दिला नव्हता. कोणाही निरीक्षकाला सहज दिसणाऱ्या अेका गोष्टीला या चौकशींत दुजोरा मिळाला. ती अशी की बहुतेकांची वागणूक कायद्याशीं किंवा प्रचलित नीतीशीं जुळणारी नसते.

या चौकशींत पुढील गोष्टी प्रामुख्याने दिसून आल्या. पहिली गोष्ट अशी की कामुकता फार लहान वयापासून दिसून येते. वयांत आलेल्या माणसाच्या कामपूर्तीसारखी हुबेहुब स्थिति चार महिन्यांच्या मुलांत आढळलेली आहे. अर्थात् या वयांत रेतस्खलन अशक्य असतें, पण बाकीच्या शारीरिक खुणा जुळतात. हा अपवाद झाला, पण या संशोधकांचे मतें ज्या समाजांत कामुकतेवर निर्बंध नसतील, तेथे तीनचार वर्षांच्या वयांत बहुतेक मुलांत कामपूर्तीची लक्षणें दिसतील.

पुष्कळांची अशी कल्पना असते की पुरुषाची कामशक्ति ३० वयाच्या सुमारास सर्वांत जास्त असते, पण हें खरें नाही. सर्वांत जास्त शक्ति वयांत येण्याच्या सुमारास, किंवा त्याच्याही अगोदर असते. आणि तारुण्यांत कामवासनेला आळा घातल्याने ही शक्ति म्हातारपणापर्यंत टिकते हीही कल्पना खोटी आहे. ज्यांनी तारुण्यांत मनसोक्त उपभोग घेतला, अशांची कामशक्ति तारुण्यांत ब्रम्हचर्य पाळणारांइतकीच किंवा त्याहीपेक्षा जास्त टिकली, अशीं पुष्कळ उदाहरणें आढळलीं.

समागमाचा स्वप्नावस्थेशीं कांही संबंध दिसत नाही. म्हणजे ज्यांची कामशक्ति जास्त असते, ते समागमही जास्त वेळां करतात आणि त्यांना

स्वप्नावस्थाही जास्त होते. आणि ज्यांची शक्ति कमी असते, त्यांना कदाचित् स्वप्नावस्था होणारही नाही.

शेंकडा ९२ पुरुषांना स्वसंभोगाच्या संवयीपासून कोणताही अपाय झाला नाही. कालेजांत शिकलेल्या विवाहितांपैकीं शेंकडा ६९ विवाहानंतरही स्वसंभोग करतात असें आढळलें, शेंकडा ३७ पुरुष समसंभोग करतात असें आढळलें, परंतु या सर्वांना समसंभोगापासून कामपूर्ति होत नसून फक्त शेंकडा ६.३ पुरुषांना होते. शेंकडा ६९.४ पुरुषांना स्त्रियांपासून कामपूर्ति मिळते.

कालेजांत शिकलेल्या पुरुषांपैकीं शेंकडा ६७ विवाहापूर्वी समागम करतात, दुय्यम शाळांच्या विद्यार्थ्यांत हें प्रमाण शेंकडा ८४ आणि मोठ-मोठ्या प्रसिद्ध शाळांच्या बाबतींत हें प्रमाण शेंकडा ९८ पडतें. संयुक्त संस्थानांतील शेंकडा ७० पुरुष कधीकधी वेश्यांकडे जातात. विवाहित पुरुषांपैकी शेंकडा ७० विवाहबाह्य समागम करतात, पण यांपैकी नियमानें वेश्यांकडे जाणारांचें प्रमाण फक्त शेंकडा ४ असतें.

पशुसंभोगापासून समाधान मिळवणारे पुरुष शेतांत काम करणाऱ्या तरुणांमध्यें शेंकडा १७ सांपडले, यांपैकी शाळेंत जाणारांमध्यें हें प्रमाण २६ ते २८ होतें, आणि कित्येक खेडेगांवांत हे प्रमाण शेंकडा ६५ पर्यंत होतें.

केवळ स्वतःच्या पत्नीपासूनच समाधान मिळवणारे विवाहित पुरुष शेंकडा ५० पेक्षां कमीच होते. विवाहित जोडप्यांमध्यें समागमाचें प्रमाण विशीच्या वयांत सरासरीने आठवड्यांतून ३.९ वेळां, तिशीच्या वयांत २.९ वेळां, चाळिशीला २.२ वेळां, पन्नाशीला १.८ वेळां व साठीला ०.९ वेळां होतें.

सोळा ते ४५ या वयांत शेंकडा ९९ पुरुष कोणत्यातरी प्रकारानें समागम करतात. त्याचें प्रमाण वेगवेगळ्या वयांत सरासरी मानानें आठ-वड्यांतून अेकदांपासून साडेसहा वेळांपर्यंत असतें, पण यांत वैयक्तिक फरक अतिशय असतो. उदाहरणार्थ कित्येकांना वर्षांतून दोनदां समागम

पुरेसा होतो, आणि कांहींना आठवड्यांतून तीस वेळां झाल्याशिवाय समाधान वाटत नाही.

एकंदरींत जे मूळचे श्रीमंत असतात किंवा धंद्यांत यशस्वी होतात, त्यांना समागमाची, आणि त्यांतही वैचित्र्याची जरूर जास्त भासते, मध्यम वर्गांतील लोकांत स्वसंभोगाचें प्रमाण जास्त आढळतें. पण विवाहपूर्व, विवाह-बाह्य, किंवा वेश्यांशीं समागमाचें व समसंभोगाचेंही प्रमाण बरेंच कमी असतें. मजूरवर्गांत तारुण्यांतून बाहेर पडल्यावर स्वसंभोग कमीच सांपडतो आणि प्रत्यक्ष समागम न करतां रेतस्खलनापर्यंत पोंचणाऱ्या कामक्रीडा त्यांना पसंत नसतात. एकंदरींत मध्यम वर्गांत स्वस्त्रीलाच चिकटून राहण्याची प्रवृत्ति जास्त दिसते. तथापि त्यांना कामक्रीडेची आवड असते. याउलट खालच्या लोकांना समागमाची जरूर भासते, पण ती एक चटकन् उरकून घेण्याची गोष्ट आहे अशी त्यांची भावना असते. बुद्धिमान मनुष्य म्हणतो, मी अशा क्रीडा फक्त माझ्या प्रेमपात्राशींच करूं शकतों. याउलट अशिक्षित मनुष्य म्हणतो, मी इतर कोणत्याही स्त्रीशीं अशा क्रीडा करीन, पण प्रेमपात्राशीं करणार नाहीं.

खालच्या लोकांना नग्नता आवडत नाहीं. प्राथमिक शाळांत शिकलेल्या पुरुषांपैकी शेंकडा ५७ समागमाचे वेळीं नग्न होत नाहीत. पण दुय्यम शिक्षण घेतलेल्यांमध्यें असे पुरुष फक्त शेंकडा १० च सांपडतात. मजूरवर्गांत एकंदरीने पाहतां विवाहबाह्य समागम इतर वर्गांचे मानाने कमी सांपडतो. मजूरवर्गांतला पुरुष वाग्दत्त वधूशी विवाहापूर्वी समागम करीत नाही, विवाहाच्या दिवशीं ती कुमारी असावी असें त्याला वाटतें. वरच्या वर्गांतले पुरुष वाग्दत्त वधूशीं समागम करायला मागेपुढे पहात नाहीत.

अमेरिकेंतील गोरे लोक आणि शिद्दी यांच्यांत कामुकतेच्या बाबतींत कोणताही फरक डॉ. किन्से यांना आढळला नाही. समागमाचे बाबतींत वर्गवारी लावल्यास कट्टर धर्मासक्त यहुदी, नंतर कॅथोलिक, व नंतर प्रॉटेस्टंट, यांच्यांत समागमाचें प्रमाण वाढतें दिसलें.

हा ग्रंथ फक्त पुरुषांसंबंधी आहे, स्त्रियांसंबंधी असाच एक ग्रंथ होणार आहे. आतां असा प्रश्न उत्पन्न होतो की या १२००० पुरुषांनी दिलेल्या उत्तरांवरून एकंदर अमेरिकन जनतेबद्दल अनुमान काढणें कितपत सयुक्तिक होईल ? समागमाचे बाबतींत खरें बोलणारे लोक फारच थोडे सांपडतात असा सामान्य अनुभव आहे. कित्येक आपल्या कामशक्तीची बढाई मारतात, तर कित्येक धार्मिक लोकांना या बाबतींत खरें बोलणें परवडत नाही, कारण समागम फक्त प्रजोत्पत्तीपुरताच करावा अशी शिकवण कित्येक धर्मांत असते. कांहीं असलें तरी या ग्रंथांत दिलेल्या आंकड्यांवरून पुष्कळांना आपल्या कल्पना बदलाव्या लागतील यांत शंका नाहीं.

शरीराच्या मूलभूत गरजांच्या बाबतींत कायद्यांचाही फारसा परिणाम होत नाहीं. अमेरिकेंत कांहीं संस्थानांत, उदाहरणार्थ मॅसाचूसेटसमधें अविवाहितांच्या समागमाला तीन महिने तुरुंग आणि तीस डॉलर दंड, अशी शिक्षा आहे, आणि कोणी रखेली ठेवल्यास तीन वर्षें तुरुंग आणि ३०० डॉलर दंड आहे. कॅलिफोर्निआमध्यें व्यभिचाराला एक वर्ष तुरुंग व १००० डॉलर दंड अशी शिक्षा आहे. न्यूयॉर्कमधें अविवाहितांचा समागम हा गुन्हा नाही, पण व्यभिचाराला सहा महिने तुरुंग व २५० डॉलर दंड आहे. नेब्रास्कामधें हे दोन्हीही गुन्हे नाहीत, पण व्यभिचार हें सोडलग्नाला पुरेसें कारण समजतात. समसंभोग, पशुसंभोग, वगैरे अनैसर्गिक प्रकारांना एकाच सदरांत घालतात व त्यांना कडक शिक्षा आहेत. नेव्हाडामध्यें या गुन्ह्यांबद्दल जन्मठेपेची शिक्षा देतां येते, न्यूयॉर्कमधें वीस वर्षें. कॅलिफोर्निआमधें समसंभोगाला १५ वर्षें, आणि पशुसंभोगाला १० वर्षें देतां येतात. पण या ग्रंथांतील १२००० लोकांच्या जबान्या पाहतां शेंकडा पांच गुन्हेगार तरी कायद्याच्या तावडींत सांपडतात की नाही याची शंका वाटते. अशा कायद्यांचा उपयोग देशाच्या नीतिमत्तेची जाहिरात करण्यापलीकडे कांही दिसत नाही.

---

# पुरुषांची घमेंड

'आयरिश रेडिओ न्यूज' नांवाच्या पत्रांत 'सॅली श्रिप्टन' नांवाच्या बाअीने अेक तुलनात्मक लेख लिहिला आहे, त्याचा सारांश पुढें दिला आहे.

पुरुषांना आपल्या शक्तीची बरीच घमेंड असते आणि आम्ही बायका या घमेंडीचा फुगा कायम ठेवण्याचाच प्रयत्न करीत असतों. याच्या परिणामीं कित्येक समाजांत किंवा समाजाच्या कित्येक थरांत स्त्रियांना अन्नवस्त्र व राहण्यास जागा आणि सर्व अितर गरजा पुरविणें हें पुरुषांना आपलें कर्तव्य वाटतें. आणि याचें कारण अेकच, की आम्ही त्यांच्या घमेंडीला खाद्य पुरवितों.

पुरुष आमच्यापेक्षां आकारानें आणि वजनाने मोठे असतात हें खरें, तरीपण ज्या देशांत स्त्रियांना पुरुषांचें शिक्षण नीट करतां आलेलें नाहीं, अशा देशांत शारीरिक श्रमाचीं सर्व कामें स्त्रियांनाच करावीं लागतात. उंची आणि आकार सोडून दिला तर पुरुषांमध्यें स्त्रियांपेक्षा जास्त असें काय आहे ? जन्मसंख्या पाहिली तर मुलांची संख्या मुलींपेक्षां जास्त असते, पण पहिल्या कांहीं महिन्यांतच मुलगे जास्त मरतात आणि शेवटीं मुलींचीच संख्या जास्त शिल्लक राहते, कारण मुली जास्त कणखर असतात. ( ही स्थिति यूरोपांत विशेषत: दिसते. **—र. धों. क.** )

आम्ही थंडी जास्त प्रमाणांत सहन करूं शकतों. पुरुषांना ताबडतोब सर्दी होते, आम्हाला तितकी सहज होत नाहीं. पुरुष दहा मिनिटें समुद्रांत पोहला ( हेंही वर्णन यूरोपांतलें, म्हणजे थंड प्रदेशांतलें आहे ), तर त्याचा चेहरा जांभळा पडतो, दांतखिळी वाजते, गुडघे अेकमेकांशीं टक्कर घेतात. स्त्री तितकाच वेळ पोहली तरी तिला थंडी झाल्याचें बिलकुल चिन्ह दिसत नाहीं. आमच्या अंगांत चरबी जास्त असल्याचा हा परिणाम आहे, पण त्याला आम्ही काय करणार ?

## पुरुषांची घमेंड

कित्येक स्त्रिया बाळंतपणांत मरतात हें सोडून दिलें तर विमा कंपन्यांच्या आंकड्यांवरून असें दिसतें कीं स्त्रिया पुरुषांपेक्षां जास्त जगतात. तेव्हां पुरुषांना शक्तीची घमेंड कां असावी ?

गणितांत पुरुषांची गति सामान्यतः जास्त असते असें कदाचित् म्हणतां येईल, पण याउलट आम्ही शिवणकाम, विणकाम, वगैरे कलाकौशल्याचीं कामें किती करतों तें पहा ! शिवाय आम्ही शरीराला सौंदर्य आणून त्यांना जाळ्यांत पकडतों त्याचें काय ?

आणखी अेक गोष्ट म्हणजे रंग ओळखण्याच्या बाबतींत पुरुष मागें पडतात आणि आगगाडीवरील किंवा आरमारांतील कामांत रंग ओळखतां येत नाहींत म्हणून कित्येक पुरुषांना नाकारतात. हा दोष स्त्रियांत फारच कमी प्रमाणांत असतो. कदाचित् पुरुषांच्या पोषाखाचा रंग गचाळ असतो आणि स्त्रिया सुंदर रंगीत कपडे वापरतात, याचें हें तर कारण नसेल ?

पुरुषांना बुद्धि जास्त असते ? बुद्धीची कसोटी पाहण्याची रीत हल्ली लहान मुलांना लावतात, पण स्त्रीपुरुषांची तुलना या कसोटीनें अजून कोणी केलेली नाही. ती केली असती तर कदाचित् तोही फुगा फुटला असता. कांही असो, ज्या ज्या धंद्यांत स्त्रियांचा शिरकाव झालेला आहे, त्यांत स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने काम करतात. ट्रॅम व बस कंडक्टरचें काम करणाऱ्या स्त्रिया पुरुषांचे मानाने कमी आहेत, परंतु तुलना केल्यास स्त्रियांकडून अपघात पुरुषांपेक्षा कमीं प्रमाणांत होतात असें आढळतें.

पुरुषांना शक्ति जास्त असल्यामुळें ते अधिक समाधानी वृत्तीचे असतात काय ? नाहीं. आत्महत्यांचें प्रमाण पुरुषांत जास्त सांपडतें. खून करणारांची संख्या पाहिली तर त्यांत पुरुषांची संख्या फारच मोठी आहे, आणि ते ज्यांचा खून करतात, त्यांत स्त्रियांचीच संख्या जास्त असते. कदाचित् पुरुषांचें सरासरी आयुष्य स्त्रियांचे मानाने थोडेंसें वाढवण्याचा हा प्रयत्न असावा !

पुरुषांच्या स्वभावांत स्त्रियांचे मानाने धिमेपणा फार कमी. अेखाद्या

दुकानाशीं गिऱ्हाईकांची रांग असली, आणि तींत अेखादी स्त्री अगदी शेवटीं असली, तर ती विणकामासारखें कांहींतरी काम करूं लागेल, पुरुष निष्कारण मनाला त्रास करून घेअील. त्याचप्रमाणें माल घेतांना नीट पारखून घेण्याची पुरुषाना संवय नसते. त्यांना कोणीही सहज फसवावें.

दुष्काळाच्या दिवसांत पुरुषच स्त्रियांपेक्षां लवकर मरतात, कारण स्त्रियांचे अंगांत चरबी जास्त असल्यामुळें ती अशा वेळीं उपयोगीं पडते. आणि जग चाललें आहे असेंच पुढें चाललें, तर गरीब बिचाऱ्या पुरुषांचे हाल कुत्रा खाणार नाहीं. ( फ्रेंच मासिकावरून )

---

# पत्रव्यवहार

## १

जूनच्या अंकांत आपण ‘ बहिष्काराची पुरवणी: ब्रह्मचर्य–२ ’ या सदराखाली लेख लिहून ब्रह्मचर्यासंबंधाने जीं विधानें केलीं आहेत, तीं अगदीं, अयोग्य आहेत. ‘ब्रह्मचर्येण तपसा देवा मृत्युमुपाघ्नत । ब्रह्मचारी चरति ...’अशा प्रकाराने वैदिक वाङ्मयांत ब्रह्मचर्याची थोरवी गाअिलेली आहे. ब्रह्मचर्याने आरोग्य राहून दीर्घायुषी होतो ही थाप नाहीं, असें मी माझ्याच अनुभवावरून सांगतों. आपलें केवळ आंग्लभाषेचें अध्ययन झालें असून वेद, उपनिषद, षट्शास्त्र, अित्यादिकांचें अध्ययन झालेलें नाही, म्हणून आपण असे बेजबाबदारीचे लेख लिहून तरुणांची दिशाभूल करीत आहां. मी बी. अे. पावेतों अिंग्रजी शिक्षण घेतलें असून वैदिक वाङ्मयाचाही अभ्यास केला आहे आणि अीशकृपेने चीन, जपान, यूरोप व अमेरिकेचाही प्रवास केला आहे. मी पाश्चात्यांची री ओढणारा नाही. मला तर माझ्या प्राचीन ऋषि-मुनींचा आणि वैदिक वाङ्मयाचाच सात्विक अभिमान वाटतो. समर्थ रामदास, स्वामी दयानंद, स्वामी विवेकानंद, हे काय तोतये ब्रह्मचारी होते ? हलीच्या या पडत्या काळांत बडोद्याचे प्रो. माणिकराव, आचार्य विनोबा

भावे, मुंबईस चौपाटीवर असलेल्या कैवल्यधामाचे संचालक स्वामी कुवलयानंद, ऋषीकेश येथील स्वामी शिवानंद, हे अखंड ब्रह्मचारी आहेत. यांच्या ब्रह्मचर्याबद्दल शंका घेण्यास कोणासही तिळमात्र वाव नाही. आपला वैदिक वाङ्मयाचा किती अभ्यास झाला आहे, याचा खुलासा जुलैच्या अंकांत करण्याची मेहरबानी करावी.-**अेक वाचक**

उ. वाचकांचीं पत्रें अनुक्रमाने न घेतल्यास अन्याय होतो, म्हणून हें पत्र जुलैच्या अंकांत देतां आलें नाही. आमचा वैदिक वाङ्मयाचा अभ्यास जवळजवळ शून्य आहे हें प्रथमच सांगतों. आपल्याअितके शिकलेले, अभ्यास केलेले आणि प्रवास केलेले लोक फारच विरळा यांत शंका नाही, तरी देखील उत्तर देण्याचें धाडस करतों. आपण पाश्चात्यांची री न ओढतां पौर्वात्यांची ओढतां, हें आपल्या पत्रावरून उघड दिसतें. आम्ही री कोणाचीच ओढीत नाही. शास्त्रीय सत्यांत पाश्चात्य व पौर्वात्य असे भेद नसतात. आपल्याप्रमाणें जे तसे भेद मानतात, त्यांना पूर्वग्रह बाजूला ठेवतां येत नाहीत याचाच तो परिणाम असतो, आणि असे लोक शास्त्रीय ज्ञान मिळवण्यास नालायक असतात, कारण तें अवलोकनावर आणि तर्कशास्त्रावर आधारलेलें असतें, आणि त्यांत पूर्वग्रहांचें लोढणें आड येतें. वैदिक वाङ्मयांत ब्रह्मचर्यांची थोरवी गाअिली असेल, पण त्यावरून कोणतेंही अनुमान काढतां येत नाही. मी वेद प्रमाण मानीत नाही, तेव्हां वेदवाक्यांना बाबावाक्यांपेक्षा जास्त किंमत देत नाही, आपण दिलेल्या वाक्याचा अर्थ 'देवांनी ब्रह्मचर्यानें मृत्यूला जिंकलें' असा मला वाटतो. तो बरोबर असल्यास देवांनी अमृताचे बाबतींत असुरांना अन्याय कां केला, आणि त्यांनी संजीवनी विद्या हस्तगत करण्याची खटपट कां केली? शिवाय देव हे मनुष्याच्या डोक्यांतून निघालेले आहेत, तेव्हां वेदांत देवांसंबंधी कांहीही लिहिलें असलें, तरी त्याला काय किंमत आहे? ज्यांचीं नांवें आपण ब्रह्मचारी म्हणून दिलीं आहेत, त्यांचेविषयीं कांहीच लिहिणें शक्य नाही, कारण कोणीही खरा ब्रह्मचारी आहे की नाही हेंठरवायचें कसें? त्याबाबत कोणत्याही बाजूने पुरावा मिळणें शक्यच

नसल्यामुळें तो मनुष्य म्हणेल तेंच शिष्टाचाराकरतां तरी खरें मानावें लागतें. आतां आपण स्वतःविषयीं जें विधान करतां, तें तर फारच अजब आहे! ब्रह्मचर्यानें आरोग्य राहून दीर्घायुषी होतो, हें आपण स्वानुभवावरून सांगतां, पण आपलें वय किती तें मात्र सांगत नाहीं! तें शंभराच्या पलीकडे गेलें आहे का? आपल्या मतानें आपलें आरोग्य चांगलें असेल कदाचित्, पण आपलें मत म्हणजे पुरावा नव्हे. शिवाय आपल्याला तर्कशास्त्राचा गंध देखील नाहीं हेंही त्यावरून दिसतें. कारण आपण म्हणतां तसा अनुभव येण्याकरतां आपणांस दोन्ही प्रकारचे अनुभव घेतले पाहिजेत, म्हणजे कांहीं दिवस ब्रह्मचर्य पाळून आणि कांहीं दिवस न पाळून आरोग्य कसें राहतें हें तुलनेने ठरवलें, तरच तो अनुभव म्हणतां येअील. आणि अितकें केलें तरी तो अेका माणसाचा अनुभव होअील. आपणास कदाचित् ब्रह्मचर्य मानवलें असेल, पण त्यावरून सामान्य सिद्धांत निघत नाही. दीर्घायुष्याबद्दल आमच्या अेप्रिलच्या अंकांतील लेख पाहिल्यास त्यांत शंभरांच्या पुढच्या लोकांसंबंधीं कांहीं आंकडे दिले आहेत. त्यांवरून असें दिसतें कीं त्यांतील स्त्रियांपैकी शेंकडा ९८ आणि पुरुषांपैकीं शेकडा ९६ विवाहित होतीं. म्हणजे अविवाहित देखील अपवादात्मक होते, आणि तेही ब्रह्मचारी असतील असा नियम नाहीं. या दीर्घायुषी लोकांत ब्रह्मचाऱ्यांची संख्या जास्त कां नाही? आतां हे आंकडे पाश्चात्य असल्यामुळें खोटे समजायचे, की यूरोपांत कोणी ब्रह्मचारी नसतातच अशी आपली कल्पना आहे? ब्रह्मचर्याची थोरवी हिंदु धर्मातच सांगितली आहे आणि क्रिस्ती धर्मांत नाहीं, अशी कल्पना असली तर ती चूक आहे. त्यांनीं ब्रह्मचर्याला अतिशय महत्व दिलेलें आहे. आतां प्राचीन ऋषिमुनींचा आपल्याला अभिमान वाटतो म्हणतां, पण त्यांतले ब्रह्मचारी किती होते? ऋषींबद्दल आदर वाटण्याच्या मुळाशीं अशी विचारसरणी असते की उत्क्रांतिवाद पाश्चात्य असल्यामुळें तो खोटा, अीश्वराने प्रथम कांहीं ऋषि स्वतः निर्माण केले आणि त्यांना प्रजोत्पादनाचें काम सांगितलें, हे पहिले ऋषि सर्वांत मोठे आणि तेथपासून मानवजातीची अेक-

सारखी अवनति होत गेलेली आहे, तेव्हां ऋषि किंवा कोणीही जितका अधिक प्राचीन तितका अधिक आदरणीय! ज्यांना कांही आधुनिक ज्ञान आहे, त्यांचे मताने मनुष्याची उत्क्रांति खालच्या प्राण्यांपासून झाली आहे आणि आपल्या पूर्वजांना जर पूज्य मानायचें असेल तर वानरांना माणसापेक्षां फारच पूज्य मानावें लागेल. हें आपल्या मताने खोटें असलें, तरी ज्या प्राचीन ऋषींनी सूर्य, अग्नि, वायु, समुद्र, पर्वत, नद्या, कित्येक झाडें आणि कांही पशु, यांना देवपण देऊन त्यांची पूजा केली, अितकेंच नव्हे तर गाअींचें शेण खाण्यापर्यंत ज्यांची मजल गेली, अशा ऋषींबद्दल आदर कां वाटावा? आपणास वाटत असेल तर खुशाल वाटो, पण हें समंजसपणाचें लक्षण नव्हे. आमचें शिक्षण आणि अभ्यास अर्थातच आपल्या पासंगालाही पुरणार नाहीत, तरीसुद्धां आम्हाला स्वतःच्या बुद्धीने विचार करून जरूर तर बाबावाक्य धाब्यावर बसविण्याचा हक्क आहे असें आम्ही मानतों. ब्रह्मचर्यावर आणखीही लेख येणार आहेत, ते डाक्तरांच्या अवलोकनावर आधारलेले आहेत आणि वैदिक वाङ्मयापेक्षां त्यांची किंमत जास्त आहे. आमचे मतें मनुष्याचें ज्ञान कमी होत गेलेलें नसून वाढतच गेलेलें आहे आणि प्राचीन ऋषींना आमच्याअितकें ज्ञान खात्रीने नव्हतें. अर्थात् ही त्यांची चूक नव्हे, पण हें न ओळखतां त्यांना फाजील महत्व देणारांची मात्र दया येते. **सं**.

२

बजरंग बलीकी जय! कृ. सा. वि. वि. आपण आपल्या समाजस्वास्थ्याने जगावर अनंत उपकार करून ठेवले आहेत हें मी कालांतरींही विसरणार नाहीं. मी आपलीं मासिकें वाचतों, त्यांत कांहीं ठिकाणीं संस्कृत श्लोकही लिहिलेले असतात, यामुळें तर आपलेविषयीं अधिकच आदरबुद्धि मला वाटते. मी पुढील औषध विचारतों तें कळवण्याची कृपा करावी. कायमचें वीर्य बंद होणें, म्हणजे स्त्रियांशीं जाऊं नये असें वाटणें. हें औषध नसेल तर स्वप्नअवस्था बंद होणें. जालीम औषध कळवावी. वीर्य कायमचें

बंद होणें, हें औषध कळविण्याविषयीं मी आपणापुढें अपेक्षारूपी पदर पसरतों. तरी उत्तररूपी भीक घालावी अशी माझी कलकळीची विनंति आहे. सदरहू गोष्ट ब्रह्मचारी याकरतां आहे. आपला...

उ. अशी औषधें कदाचित् असलींच तर ती अत्यंत विषारी असलीं पाहिजेत. त्यांपासून दूरच राहणें बरें. ब्रह्मचर्य राखण्याकरतां ज्यांना औषधें घ्यावीं लागतात, त्यांनीं त्या भानगडींत न पडणें बरें, कारण नुकसान झाल्यावांचून राहणार नाहीं. भूक लागूं नये याकरतां औषध घेण्याइतकाच हाही गाढवपणा होईल. **सं.**

३

१. मेचे अंकांत ३ ऱ्या पत्राचे उत्तरांत 'चोरी करणें ही अनीति कां, याची कारणें सांगतां येतील,' येवढेंच दिलें, त्याऐवजीं कांहीं उदाहरणें देतां तर वाचकांचें अधिक समाधान होतें, आणि बुद्धिप्रामाण्य लोकांच्या नीति-अनीतीच्या कल्पना समजल्यास बरें. २. जातीय तेढ अहिंसात्मक शांततेच्या मार्गानें मिटवणें हें नैतिक दृष्टीने फार उच्च दर्जाचें असें गांधी-वादी समजतात, परंतु यांतील व्यावहारिक सत्य व त्याचे परिणाम तूर्त हैद्राबाद प्रकरणीं दृष्टोत्पत्तीस येत आहेत. तेव्हां हें सर्व प्रकरण नीतीच्या कोठल्या पातळीवर बसूं शकेल? ३. एका जुन्या अंकांत 'एका जोडप्या-पैकी दोघेंही प्रजोत्पादनाच्या दृष्टीने पूर्ण निर्दोष असूनही त्यांना संतति झाली नाहीं,' यावर 'असें क्वचित् घडतें,' असा आपला शेरा आहे. अशा घट-नेस सनातनी दैव म्हणतात. दैव, नशीब, विधिघटना, वगैरे न मानणारे अशा प्रकारास काय म्हणतात? ४. मानव व पशु यांचे संततीमध्यें अत्यंत चमत्कारिक बालकें क्वचित् निर्माण होतात. नुकतेंच एका म्हशीस २ तोंडें, ४ डोळे व ३ कान असें रेडकूं झालें असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. अशा प्रकारांना शास्त्रज्ञ काय म्हणतात? **वि. वि. लिमये.**

उ. १. स्वतःचे हक्क संभाळतांना एखादे वेळीं दुसऱ्याचें नुकसान होण्याचा संभव असतो, पण हें कारण नसतांना दुसऱ्याचें नुकसान

होईल असें वागणें म्हणजे अनीति, अशी आमची व्याख्या आहे. चोरीनें दुसऱ्याचें नुकसान होतें हें उघड आहे, उदाहरणांची जरूरी दिसत नाहीं. २. जातीय तेढ अहिंसात्मक मार्गांनी नाहीशी न झाली तरी ती लढाईनें-ही नाहीशी होणार नाहीं. हक्कांकरतां जरूर तर लढाईही करणें यांत अनीति नाहीं. ३. यांत दैव वगैरे मानण्याचें कांहींच कारण नाहीं. पुष्कळ गोष्टींचीं कारणें शास्त्रज्ञांना समजलेलीं नसलीं किंवा कधीच समजण्यासारखीं नसलीं तरी त्यांचें ज्ञान पूर्ण नाहीं इतकेंच सिद्ध होतें, त्यांतून ईश्वर सिद्ध होत नाहीं किंवा देव वगैरे कांहीतरी निसर्गनियमांच्या पलीकडचें असतें असेंहि सिद्ध होत नाही. ४. कधी कधी जुळीं मुलें होण्याऐवजीं एकमेकांना चिकटलेलीं मुलें होतात, त्याच प्रकारचा हा अपघात आहे. यांत दोन रेडकांचे अवयव मिसळले आहेत. त्यांची नीट वाढ झाली असती तर तीं वेगळीं रेडकें झालीं असतीं. **सं.**

---

# शारदेचें पत्र

नागपूरच्या 'भवितव्य' च्या सोंवळेपणाचा आणखी एक मासला म्हणजे या मासिकाच्या मेच्या अंकांत शेवटीं 'नवा धंदा' म्हणून जो लहा-नसा परिच्छेद दिला आहे, त्यावर त्यांनी केलेली टीका. ज्या बायकांना उघडपणें बाळंतपण करणें कांही कारणाने अनिष्ट असेल, अशांची बाळंतपणें गुप्तपणें करण्याची व्यवस्था करून नंतर त्या मुलांना निपुत्रिक लोकांना दत्तक देणें, हा नवा धंदा पॅरिसमधें निघाला आहे आणि तो येथेही चालण्यासारखा आहे, असें त्यांत थोड्याशा विनोदी भाषेंत सांगितलें आहे. विनोद सर्वांनाच कळतो असें नाही. तो त्यांना न कळला तर मोठेंसें आश्चर्य नाही. पण असें करण्याने अनीतीला प्रोत्साहन मिळतें आणि याला कर्व्यांच्या शिवाय कोणी चांगलें म्हणणार नाही, ही टीका मात्र अज्ञानमूलक आहे. गुप्त बाळंतपणाची सोय प्रार्थनासमाजातर्फे फार वर्षांपासून पंढरपूरला होत असते आणि अलीकडे

श्रद्धानंदाश्रमासारख्या संस्था ही गुप्त सोय करीत असतात, हें त्यांना माहीत नसावेंसें दिसतें. अशी सोय केल्यावर त्या मुलांचीही कांहीतरी व्यवस्था करणें जरूर असतें. येथल्या कांही सूतिकागृहांतून नको असलेल्या मुलांना अनाथालयांत पाठविण्याची व्यवस्था होते आणि यांतलीं कांही मुलें निपुत्रिक लोक दत्तक घेतात. श्रद्धानंदाश्रमाच्या मागें डॉ. जयकरांसारख्यांचीं नांवें आहेत. आणि प्रार्थनासमाजांत देखील बरेच प्रतिष्ठित लोक आहेत. हे लोक देखील अनीतीला उत्तेजन देतात काय? ही सोय करण्यांत समाजाचें हितच होतें असें या लोकांचें मत असलें पाहिजे. मग तशीच व्यवस्था एखाद्याने धंदा म्हणून केली तर त्यांत शिव्या देण्यासारखें काय आहे हें मला कळत नाही. समाजहिताची गोष्ट केवळ परोपकार म्हणून फुकटच केली पाहिजे, असें म्हणणें असेल तर शिक्षणसंस्थांतील लोकांनी पगार घेतां नये असा त्याचा अर्थ होईल. कित्येकांनी अल्प वेतन घेऊन शिक्षणसंस्था चालविल्या आहेत हें खरें, पण भरपूर पगार घेऊन चालविलेल्या संस्था देखील नाहीत असें नाही, आणि त्यांना दोष द्यायला बिलकुल जागा नाही. नको असलेल्या मुलांची फुकट सोय करणाऱ्या संस्था आहेतच, पण तीच सोय कोणी पैसे घेऊन केली तर मात्र तें अनीतीला उत्तेजन होतें, ही टीका अचरटपणाची आहे.

प्रो. क्षीरसागरांचीं मतें विक्षिप्तच असतात किंवा कदाचित् ते मुद्दामच विक्षिप्त मतें लिहीत असतील. शिवाजीसारख्या महापुरुषाचा एकवचनी उल्लेख केल्याबद्दल नुकतेच ते कोणावर तरी घसरले होते. मला तर वाटतें की ऐतिहासिक पुरुषांबद्दल एकवचन वापरण्याची पद्धतच आहे. शिवाजी आले होते, हें वाक्य माझ्या कानाला तरी कसेंसेंच लागतें. अर्थात् शिवाजी महाराज आला होता, असें कोणी लिहिणारच नाही, कारण तेंही चमत्कारिक लागतें. पहिला बाजीराव, दुसरा बाजीराव, येथे जसें एकवचन चालतें, तसेंच शिवाजीलाही कां चालूं नये? आणि ही केवळ ऐतिहासिक पुरुषांचीच गोष्ट नव्हे, तर हयात असलेल्या सर्वच मोठ्या माणसांबद्दल आपण एकवचन वापरतों. रूझवेल्ट आला होता, असें तर आपण म्हणतोंच आणि त्यांत

अपमान करण्याची इच्छा नसते, तसेंच परप्रांतीय हिंदी माणसांबद्दल देखील आपण एकवचन वापरतों आणि तें देखील अपमान करण्यारितां नव्हे. ही भाषेची एक लकब आहे, हें क्षीरसागरांना कळायला पाहिजे होतें.

डॉ. केतकरांच्या नंतर आतां क्षीरसागर कालिदासाचे कान उपटायला निघाले आहेत. वाटव्यांनी केलेली कालिदासाची स्तुति त्यांना खपली नाही आणि त्यांना त्याच्या काव्यांत विकृत शृंगाराप्रियता दिसते. कालिदासाने विकृत शृंगाराचें वर्णन कोठेच केलेलें नाहीं, नैसर्गिक शृंगाराचेंच वर्णन केलेलें आहे. आतां कृष्णराव मराठ्यांना तें रुचेल किंवा पचेल किंवा नाही, याचा विचार कालिदासाने केलेला नसावा, कारण त्याच्या वेळीं असे खुळचट लोक कदाचित् नसतीलही. याबद्दल त्याला दोष देतां येणार नाहीं. पण क्षीरसागरांच्या मतें अंतिम सौंदर्य काय तें श्रीहरीच्या चरणकमलांत असतें, स्त्रीजनांच्या चरणकमलांत नसतें. अेकंदरींत जें कधीच कोणी पाहिलें नाही, त्याचेंच वर्णन कवींनी करावें, प्रत्यक्षाचें वर्णन करूं नये, असें त्यांचें मत असावें. हें मत मोठेंसें समंजस आहे असें मला वाटत नाहीं. कवींनी नेहमी थापाच दिल्या पाहिजेत असा कोठेही दंडक नाही, त्यांना देण्याची मुभा असते हें सर्वमान्यच आहे.

अशा थापा येथल्या कांग्रेस कमिटीने पसंत केलेल्या राष्ट्रगीतांत भरपूर आहेत हें मीं तुला लिहिलेंच आहे. पण राष्ट्रगीतांत थापा असल्याच पाहिजेत असें मला वाटत नाहीं, कारण अशा थापांनी तें हास्यास्पद होतें. 'सुजलां सुफलां मलयजशीतलां' हें वर्णन सुंदर असलें तरी खोटें आहे, हें फक्त हिंदी लोकांनाच नव्हे तर हिंदुस्थानांत येऊन गेलेल्या कोणालाही माहीत आहे. मग अशा रीतीने जगांत आपलें हंसें करून घेण्यांत काय अर्थ आहे? ज्या दोन गीतांत चढाओढ होती, त्यांतलें अेक हें असें खोटें आहे आणि दुसरेंही फारसें खरें नाही. अितकेंच नव्हे तर त्यांतला 'भारत-भाग्य-विधाता' हा शब्द अेका व्हाअिसरॉयला उद्देशून लिहिला होता असें म्हणतात. तें टागोरांनी लिहिलेलें असलें तरी तें राष्ट्रगीत होण्याच्या योग्यतेचें नाही.

पण राष्ट्रगीत म्हणण्यायोग्य गीत कोणी लिहिलेलेंच नाही असें मात्र नाही. ‘ धनुर्धारी ’ च्या १७ जुलैच्या अंकांत जें ‘ वंदेमातरम् ’ याच नांवाचें मद्रासकडील ‘ भारती ’ नांवाच्या कवीने मूळ तामिळ भाषेंत लिहिलेलें गीत, हिंदी आणि अिंग्रजी भाषांतरासह छापलें आहे, तें सर्व दृष्टीनीं या दोन्ही गीतांपेक्षां अधिक योग्य आहे. आअी नकटी असली तरी तिचें सुंदर म्हणून वर्णन करणें हें खरें मातृप्रेम नव्हे, तर ती कशीही असली तरी माझी आअी आहे आणि मला ती आवडते, हें वर्णन खऱ्या मातृप्रेमाचें निदर्शक आहे. मायभूमीचें वर्णनही अशाच स्वरूपाचें असलें पाहिजे आणि या गीतांत तें तसें आहे. कसाही असला तरी हिंदुस्थान हा माझा देश आहे आणि मला तो सर्वस्वी प्रिय आहे, असें म्हणण्यांतच खरी देशभक्ति आहे आणि हें गीत अशाच प्रकारचें आहे. तें बाकीच्या दोन्ही गीतांपेक्षा सरस आहे, मग स. का. पाटील आणि त्यांचे बगलबच्चे कांही म्हणोत.

गडकऱ्यांची नाटकें मला कधीच फारशीं आवडलीं नाहींत आणि त्यांतल्या त्यांत ‘ अेकच प्याला ’ या नाटकाची लोक इतकी स्तुति कां करतात कोणाला ठाऊक ? ‘साहित्य’च्या गेल्या अंकांत प्रो. वा. ल. कुळकर्णी यांनी या नाटकावर एक टीकात्मक लेख लिहिला आहे, तो तूं जरूर वाच. गडकऱ्यांनी स्वतःचीं बरोंचशीं मतें मांडण्याकरतां भगीरथ या पात्राचा उपयोग केला आहे. प्रेमभंगामुळे दारू पिऊं लागलेला आणि रामलालचीं व्याख्यानें अैकून ताबडतोब दारू सोडणारा हा प्राणी लगेच शरदवर प्रेम करूं लागतो आणि शेवटीं आचरटपणाचा कळस म्हणजे उदारपणाने या प्रेमाचा त्याग करून तो तिला रामलालशीं लग्न करण्याचा उपदेश करतो, जणूं काय तिच्यावर प्रेम केल्यामुळे तिला पाहिजे त्याला देऊन टाकण्याचा हक्क उत्पन्न होतो ! हा आपण मोठा स्वार्थत्याग करतों अशी त्याची प्रामाणिक समजूत असते आणि याबद्दल प्रेक्षकांनी त्याचें कौतुक करावें अशी गडकऱ्यांची अिच्छा ! अेकंदरींत नाटकाला न शोभणारी अक्षम्य व्याख्यानबाजी या नाटकांत अनेक पात्रें करतात. पण जाऊं दे, तूं तो लेखच वाच.

गडकऱ्यांवरून ' शेक्सपिअर ' ची आठवण व्हायचें कारण नाही, पण झाली. त्याच्याबद्दलही कांहीं लोकांना अितका आदर वाटतो की त्याच्या नाटकांवर टीका केलेली त्यांना खपत नाही. तरीपण अेकाने त्याच्या ' हॅम्लेट ' वर अशी टीका केली आहे की त्यांतलें पोलोनिअस हें पात्र अत्यंत हलक्या दर्जाचें आहे, तो अेक हांजीहांजी करणारा खुशमस्कऱ्या आहे, तरीपण आपल्या मुलाला निरोप देतांना तो त्याला जो उपदेश करतो, तो अत्यंत शहाणपणाचा आहे. शेक्सपिअरने स्वतःचे विचार त्यांत घातले असावे, परंतु त्या पात्राच्या तोंडांत ते शोभत नाहीत. माझ्या मतें हा मुद्दा बरोबर आहे. याच टीकाकाराने त्याच नाटकांत आणखी एक चूक दाखवली आहे. हॅम्लेट जें एक उपनाटक कांहीं नटांकडून करवून घेतो, तें नाटक कसें करावें या विषयावर तो त्यांना व्याख्यान देतो. तेही शेक्सपिअरचे स्वतःचेच विचार आहेत. तो नाटककार होता तसाच नटही होता, पण हॅम्लेटसारख्या राजपुत्राच्या तोंडीं हा उपदेश कितपत शोभतो असा प्रश्न आहे. मला वाटतें हाही मुद्दा बरोबर आहे. पण पुष्कळांना ही टीका रुचणार नाही.

तुझी **शारदा**

---

# आहाराविषयीं अेक गैरसमज

आहाराविषयीं अनेक विक्षिप्त कल्पना कांहीं लोकांनीं मांडलेल्या आहेत आणि अशा कल्पनांचा जोराने निषेध करणें जरूर आहे. अशा कल्पनांपैकीं अेक ' हे डाअेट् ' या नांवाने प्रसिद्ध आहे ( डॉ. हे यांचा आहार ) ही कल्पना अशी कीं प्रोटीन व कार्बोहायड्रेट ( पिठूळ पदार्थ ) अेकाच जेवणांत खावूं नयेत. ही कल्पना बरीच जुनी आहे व खोटी आहे, परंतु कांहीं लोकांच्या डोक्यांत ती अजूनही ठाण मांडून बसलेली आढळते. अिंग्लंडांतील प्रसिद्ध वैद्यकीय पत्र 'लेन्सेट' यांत १९३७ सालीं अेका संपादकीय लेखांत पुढील अभिप्राय दिलेला आहे. " कल्पना कितीही विक्षिप्त असली

तरी तिला अनुयायी मिळणें कठिण नसतें, याचा अनुभव डॉ. हे आणि त्यांचे सहव्यावसायी यांना आला आहे. त्यांची कल्पना अशी आहे की हे दोन प्रकारचे पदार्थ अेकाच वेळीं खाल्ल्याने पचनांत व्यत्यय येतो, कारण प्रोटीनमुळें जठरांत आम्ल जास्त उत्पन्न होतें, आणि यामुळे पिठूळ पदार्थांच्या पचनाला अडथळा येतो. अशा रीतीने अडथळा आल्याने पिठूळ पदार्थांचें किण्वन ( आंबणें ) सुरू होतें आणि हें सर्व अम्ल ( म्हणजे जठरांत उत्पन्न झालेलें फाजील अम्ल आणि किण्वनाने उत्पन्न झालेलें अम्ल ) रक्तप्रवाहांत शिरून अनेक प्रकारचे रोग होऊन शेवटीं मृत्यू देखील येतो. न्यू यॉर्क येथील डॉ. फोल्डेस यांनीं प्रयोगांवरून आणि अनुभवावरून ही कल्पना खोटी ठरते हें सिद्ध केलें आहे. जठरांत जें अम्ल उत्पन्न होतें, तें पिठूळ पदार्थ खाल्ल्यानेही होतें आणि प्रोटीनमुळें त्यांत फारसा फरक पडत नाहीं. जरी थोडाबहुत फरक पडला, तरी तेवढ्याने पिठूळ पदार्थांचें पचन अजीबात थांबत नाहीं आणि थांबलें तरी जठरांत किण्वन कधीच सुरू होत नाहीं. तें फारतर आंतड्यांत होअील आणि त्यामुळें फारसें जास्त अम्ल उत्पन्न होत नाहीं, आणि झालें तरीही तें रक्तप्रवाहांत शिरतें असें म्हणण्याला कोणताही पुरावा नाहीं. शिवाय डॉ. हे अेक गोष्ट विसरतात, की आपल्या अन्नाच्या पुष्कळ पदार्थांत प्रोटीन व पिठूळ पदार्थ या दोहोंचें नैसर्गिक मिश्रण असतें. दुसरी गोष्ट अशी की जठरांत पाचक अम्ल ( उदनीरिक अम्ल ) मुळींच उत्पन्न होत नसेल, तरच तेथे किण्वन शक्य आहे, अेरवीं नाही, आणि ज्यांना मधुमेहाचा रोग नसेल त्यांचें अम्लापासून कोणतेंही नुकसान होत नाही. शिवाय डॉ. हे यांच्या अनुयायांना अेक मोठा धोका असतो की त्यांच्या आहारांत प्रोटीनचें प्रमाण पुरेसें राहणार नाहीं." सामान्य नियम असा आहे की प्रोटीनचें प्रमाण पुरेसें असलें म्हणजे कार्बोहायड्रेट आपोआपच पुरेसें मिळतें, अितकें या दोहोंचें साहचर्य खाण्याच्या पदार्थांत निसर्गतः असतें. सारांश ' हे आहार ' हें अेक वेड आहे आणि त्याने नुकसानच होअील.

---

# स मा ज स्वा स्थ्य

## वर्गणीची माहिती

हें मासिक दर १५ तारखेला प्रसिद्ध होतें. वार्षिक वर्गणी तीन रुपये, व्ही. पी. ने सवातीन. पोर्तुगीज प्रांतांत किंवा परदेशीं व्ही. पी. नाही. हिंदुस्थानाबाहेर साडेतीन रुपये किंवा पांच शिलिंग. मनीऑर्डर केल्यास चार आणे वांचतील. अंक न पोंचल्याची तक्रार महिना संपण्याचे आंत आम्हास मिळाली पाहिजे. पुणें येथील ग्राहकांनी ६९-१, लॉ कॉलेज रोड, येरंडवणें, येथें वर्गणी भरल्यास चालेल.

**राइट एजन्सी, १३ नवी भटवाडी, मुंबई ४**

# आमचेकडे मिळणारा माल

| | |
|---|---|
| **लॅम्बर्ट डच कॅप**, आकार ५५ ते ७५, प्रत्येकीं | रु ५ |
| **उभट कॅप** ( देशी ) लहान, मध्यम किंवा मोठी, | रु. १॥ |
| **राइट काँट्रॅसेप्टिव्ह जेली,** | रु. ३॥ |
| **पुरुषांकरतां पिशव्या,** | ४ आणे, ८ आणे, १ रुपया |
| **कषायचूर्ण,** ( योनिमार्ग धुण्याकरतां ) | बाटलीस अडीच रुपये |
| **कामोत्तेजक नंबर १,** (प्रकृतीकरतां) | बाटलीस चार रुपये |
| **राइटट्यूब,** ( रोगप्रतिबंधाकरतां ) | १४ आणे |
| **जेलोटट्यूब** (फ्रेंच, रोगप्रतिबंधाकरतां), २ नळ्यांचे पेटीस दोन रुपये | |

**राइट एजन्सी, १३ नवी भटवाडी, मुंबई-४.**


नग्नतावादी मित्रमैत्रिणीस नग्नसंघ स्थापण्यासाठी मित्रमैत्रिणी

Registered No. B 2289.

राइट एजन्सी, नं. १३, नवी भटवाडी, मुंबई, नं. ४.

## प्रो र. धों. कर्वे, एम्. ए. कृत पुस्तकें

१. आधुनिक आहारशास्त्र, किं. १॥ रु , ट. ख. ६ आणे.

२. आधुनिक कामशास्त्र [ सचित्र ], चौथी आवृत्ति
किंमत रु. ४, ट. ख. ७ आणे.

३. संततिनियमन [सचित्र], ९ वी आ. १। रु ट. ख. ५ आ.

४. गुप्त रोगांपासून बचाव, ४ थी आ. रु १, ट. ख. ५ आणे.

५. 'समाजस्वास्थ्य' मासिकांतील निवडक लेख,
भाग १ ला [ पहिलीं तीन वर्षें ], खलास आहे.
भाग २ रा [वर्षें ४–५–६], किं. २–०–०, ट. ख. ६ आ.

६. त्वचेची निगा, किं. ८ आ., ट. ख. ५ आ.

७. गुरुबाजी ( नाटक ) किं. ८ आ., ट. ख. ५ आणे

८. वेश्याव्यवसाय, किं. २ रु., ट. ख. ६ आ.

९. तेरा गोष्टी, किं. १ रु. ट. ख. ५ आ.

१०. न्यायाचा शोध ( नवीन सामाजिक नाटक )
किंमत १ रु., ट. ख. ५

११. पॅरिसच्या परी, किं. ३ रु., ट. ख. ६ आणे.

डॉ. के. भा. लेलेकृत

१. बाहेरख्यालीचे दुष्परिणाम, २ री आ., किं. ५ आ.
२. मूळव्याध. किं. ४ आ.

मुद्रण स्थळः—पॉप्युलर प्रेस, (मुंबई) लिमिटेड, ३५, ताडदेव रोड, मुंबई–७

मुद्रक व प्रकाशकः—रघुनाथ धोंडो कर्वे, राइट एजन्सी,
नं. १३, भटवाडी क्रॉस लेन, गिरगांव, मुंबई–४